



भिन्न भिन्न भारतीय भाषांत लिहिणाऱ्या कवयित्रींची कविता स्त्रीकोश या ग्रंथातून मराठीत पहिल्यांदाच एकत्रित उपलब्ध होत आहे. समकालीन भारतीय स्त्रीकवितेचा अभ्यास करण्यासाठी स्त्रीकोश उपयुक्त आहे. पृथ्वीराज तौर आणि स्वाती दामोदरे या दोन महत्त्वाच्या अनुवादकांनी एकत्र येऊन केलेल्या या अनुसर्जनाला ऐतिहासिक महत्त्व आहे.

स्त्रीकोश भारतीय स्त्री कविता
अनुवादक :
पृथ्वीराज तौर / स्वाती दामोदरे
भ्रमणध्वनी : ९५७९१३६४६६

प्रकाशक
हस्ताक्षर प्रकाशन गृह
पावडेवाडी नाका नांदेड
भ्रमणध्वनी : ९०९६९९९८६५

आर. एन. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010

ISSN – 2229-4929
UGC Approved and
Peer Reviewed Journal

# अक्षर वाङ्मय

वर्ष : बारावे अंक : दुसरा
ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर २०२१

संपादक
डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

कार्यकारी संपादक
डॉ. शिवाजीराव देशमुख

मार्गदर्शक
डॉ. अरुण प्रभुणे

संपादक मंडळ

डॉ. बाळासाहेब लबडे
डॉ. रत्नाकर बेडगे
समन्वयक
रमेश देशपांडे, अमेरिका

डॉ. दीपक चिद्दरवार
डॉ. संदीप सांगळे
समन्वयक
सोनाली जांभेकर, अमेरिका

प्रकाशक : सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन, 'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर ४१३५१५.
मुद्रक : प्रिंटसेल्फ, १५४३ 'ओंकार कॉर्नर', नवी पेठ, पुणे-४११ ०३०
**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता :** डॉ. नानासाहेब सूर्यवंशी 'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, ता. अहमदपूर जि. लातूर ४१३५१५. भ्रमणध्वनी : ९४२३६५५८४१
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com.

**वार्षिक वर्गणी :** रु. ५००/-
**द्विवार्षिक वर्गणी :** रु. ९००/-
**पंचवार्षिक वर्गणी :** रु.२०००/-
**अंकाचे मूल्य :** रु. १२५/-

* महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.
* या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

R. N. I. FOR INDIA New Delhi
R. No. – MAHMAR-36829-2010

ISSN – 2229-4929
UGC Approved and
Peer Reviewed Journal

# AKSHAR WANGMAY

Year : 12 Volume : 2
October-November-December 2021

Editor-in-Chief
**Dr. Nanasaheb Suryawanshi**

Executive Editor
**Dr. Shivajirao Deshmukh**

Advisor
**Dr. Arun Prabhune**

Editorial Board

**Dr. Balasaheb Labde**
**Dr. Ratnakar Bedge**
Coordinator
**Mr. Ramesh Deshpande (USA)**

**Dr. Deepak Chiddarwar**
**Dr. Sandeep Sangle**
Coordinator
**Sonali Jambhekar (USA)**

Publisher : Sou. Rekhatai Nanasaheb Suryawanshi, Pratik Prakashan, 'Pranav', Rukme Nagar, Thodga Road, Ahmedpur 413515
Printer : Printself, 1543, 'Omkar Corner' Navi Peth, Pune 411 030
**Address for sending articles and fees :** Dr. Nanasaheb Suryawanshi 'Pranav', Rukme Nagar, Thodga Road, Ahmedpur 413515
District : Latur
Mobile phone : 9423655841
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com

**Subscription Rates Yearly :** Rs. 500/-
**Two years :** Rs. 900/-
**Five Years :** Rs. 2000/-
**Current Volume :** Rs. 125/-

* Maharashtra State Literary and Cultural Board has granted funds for the Publication of this Journal. But Maharashtra State Literary and Cultural Board has not been responsible for writers opinion in this Journal.
* The content and opinions expressed in the articles are the views of the authors and do not necessarily reflect the views and opinions of the periodical's Editorial Board, publisher or the advisor. The authors are solely responsible for the facts and accuracy of the content of the articles.

## अनुक्रम

- संपादकीय ---------- ५
- मुखपृष्ठाविषयी ---------- ७
- 'संगीत जयद्रथ विडंबन'- एक आकलन ---------- ३३
  प्रा. चिन्मय मधू घैसास
- भारतीय साहित्य संशोधनाच्या नव्या दिशा ---------- ४१
  डॉ. संजय कोळी
- मराठी-कन्नड साहित्य संबंध ---------- ४६
  डॉ. चंद्रकांत वाघमारे
- आदिवासी साहित्य, संस्कृती आणि कला ---------- ५१
  डॉ. एस. डी. लांडे
- कवी काळसेकर ---------- ५५
  प्रा. इंद्रजित भालेराव
- लेखकाचे घर- नरहर कुरुंदकर ---------- ६६
  डॉ. ऊर्मिला चाकूरकर
- आठवणीतले बाबा ---------- ७५
  तेजस्विनी देव
- 'आठवणी' नरहर कुरुंदकर ---------- ९२
  डॉ. बाळकृष्ण कवठेकर
- जावे त्यांच्या वंशा ---------- १०३
  सावित्री जगदाळे
- 'आस्तिक' : मिथककथा आणि गांधीवादी विचारांचे प्रतिबिंब --- १११
  डॉ. दिनेश वाघुंबरे

- संकल्पाची सिद्धी : 'वादळवाटा' ---------------------- १२३
  **डॉ. विद्यासागर पाटंगणकर**
- मराठी साहित्यातील समाजवास्तवाचे आशयाशी असणारे अनुबंध - १२७
  **डॉ. नानासाहेब पवार**
- 'पुढल्या हाका' : एक मानसशास्त्रीय दृष्टिकोन ------------- १३६
  **डॉ. प्रकाश शेवाळे**
- 'स्त्री जाणीवा आणि स्त्री संवेदना' : एक अभ्यास-
  नवा आश्वासक समीक्षा ग्रंथ ------------------------- १४१
  **प्रा. अरुण ठोके**
- कविता ---------------------------------------- १४५
  **विलास वैद्य, सुनीता धारवाडकर, डी. बी. जगत्पुरिया**
- 'अक्षर वाङ्मय' चे नूतन व नूतनीकरण केलेले वर्गणीदार ------ १५०
- संपादक मंडळ ---------------------------------- १५२



**'अक्षर वाङ्मय' ची वर्गणी मनीऑर्डर / धनादेश /धनाकर्ष संपादक 'अक्षर वाङ्मय' या नावे किंवा मेल ट्रान्सफरने वर्गणी जमा करावयाची असल्यास भारतीय स्टेट बँक शाखा, अहमदपूर, जि. लातूर येथे जमा करावी.**

**खाते:** संपादक 'अक्षर वाङ्मय' खाते क्र. ३६८३२८४६७५६
IFSC बँक क्र. SBIN - 0020041 या बँकेतील
अक्षर वाङ्मय खाते क्र. ३६८३२८४६७५६

वार्षिक वर्गणी रु. ५००/-
द्विवार्षिक वर्गणी रु. ९००/-
पंचवार्षिक वर्गणी रु. २०००/-
गुगल पे नं.- ९४२३६५५८४१




## संपादकीय

'अक्षर वाङ्मय'चा बाराव्या वर्षातला दुसरा अंक नियत वेळी आपल्या हाती देताना आनंद होत आहे.

'मुखपृष्ठाविषयी....' हा मुखपृष्ठ लेख, समीक्षा, लोकसाहित्य, ललित लेख, 'लेखकाचे घर' या लेखमालेतील पुढचा लेख, परीक्षणे आणि कविता अशा विविध प्रकारच्या लेखनाने समृद्ध असलेला सदर अंक आहे.

आज सर्वांत प्राचीन मानल्या जात असलेल्या इतिहासपूर्वकालीन आद्य हाडबासरीच्या छायाचित्राने या अंकाचे मुखपृष्ठ सजवले गेले आहे. मुखपृष्ठावरील अर्थपूर्ण छायाचित्राचे मर्म उलगडणारा 'मुखपृष्ठाविषयी....' हा मुखपृष्ठ लेख श्राव्य कलेशी संबंधित असलेला आहे. मानवाने बासरी या सुषिर वाद्याचे अनुभवांती केलेले संशोधन हे श्राव्य कलेत केले गेलेले पहिले संशोधन असावे असे आज मानले जाते. या आद्य श्राव्य कलेच्या निर्मितीच्या उत्क्रांतीचे ऐतिहासिक टप्पे या लेखात अधोरेखित केले आहेत. बासरीनिर्मितीशी संबंधित असलेल्या दोन अनुवादकथा- ग्रीक पुराणकथा आणि अमेरिकेतल्या मूळ राहिवाशांची दंतकथा- यांचा आस्वादही आपण या लेखात घेऊ शकणार आहात.

सुरुवातीच्या काही मोजक्या स्त्री नाटककारांपैकी हिराबाई पेडणेकर हे एक नाव. 'संगीत जयद्रथ विडंबन' हे हिराबाई पेडणेकर यांचे १०७ वर्षांपूर्वीचे नाटक. हे नाटक व नाटककार दोन्ही काही काळ दुर्लक्षित केले गेलेले. ऐतिहासिक मूल्य असलेल्या अशा नाटकाची परिचयवजा समीक्षा प्रा. घैसास यांनी केली आहे. नाटक आणि नाटकाच्या पहिल्या प्रयोगाविषयीची माहिती तसेच रंगकर्मींची नामावली लेखाच्या शेवटी दिली आहे. हे दस्तावेजीकरण नाट्याभ्यासकांच्या व संशोधकांच्या दृष्टीने महत्त्वाचे असून संग्राह्यही आहे.

मराठी-कानडी साहित्यिकांचा विचार करणारा डॉ. चंद्रकांत वाघमारे यांचा लेख, तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्त्व अधोरेखित करणारा डॉ. संजय कोळी यांचा लेख, आदिवासी साहित्य, संस्कृती व कला या वरील डॉ. लांडे यांचा लेख आणि इंद्रजित भालेराव यांचा सतीश काळसेकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणारा ललित लेख वाचनीय आहेत.

कै. नरहर कुरुंदकरांविषयी तीन लेख सदर अंकात आपल्याला वाचायला मिळणार आहेत. त्यांच्या सुविद्य कन्या तेजस्विनी देव यांचा वडिलांच्या कौटुंबिक



# 'पुढल्या हाका' : एक मानसशास्त्रीय दृष्टिकोन

- डॉ. प्रकाश शेवाळे

सुबोध जावडेकर यांच्या विज्ञानकथांचा विषय हा मानव व यंत्रमानव असाच राहिला आहे. या कथांमधील माणसाच्या सर्व कार्यव्यापाराचे मूळ हे मानवी मन राहिले आहे. मानवी मनच अशा साहित्याची निर्मिती करत असते आणि या साहित्याचे वाचन आणि आकलन हेच मन करीत असते. मानवी मनाचे व साहित्याचे नाते हे अजोड आहे. जावडेकरांच्या पुढल्या हाका या विज्ञानकथासंग्रहातील कथा या मानवी मनाची निर्मिती आहे. मन हे प्रवाही असते. मानवी मन, त्याचे विचार, त्याच्या भावना, समाज व वास्तव या गोष्टी सुबोध जावडेकर यांनी आपल्या कथांमध्ये मांडल्या आहेत.

या कथासंग्रहातील भाषा ही प्रभावी व प्रवाही आहे. मनाचा सतत होणारा बदल स्वाभाविक आहे. या कथांमधील मानवी मन व वर्तन यांची उकल करणे महत्त्वाचे वाटते. या संग्रहातील सर्व कथांचा विचार केल्यावर आपणास कथेची शैली, पात्रांची मनोभूमिका, परिस्थिती, जीवनसंघर्ष, स्वप्नातली जाणीव व नेणिवेच्या पातळीवरच्या असंख्य गोष्टी जाणवतात. या कथांमध्ये मानवी मनाचा एक अविष्कार आहे. चेतनपूर्व अवस्था, चेतन अवस्था, अर्धचेतन अवस्था, अचेतन अवस्था यांच्यात एक अव्यक्त संबंध असतो व त्या संबंधामुळे चेतन व अचेतन मनोव्यापारांना एक गती प्राप्त होते. एकूणच ह्याच प्रकारच्या कथा 'पुढल्या हाका' या कथासंग्रहात आपणास दिसतात.

'कलावंताचा जन्म' ही कथा या दृष्टीने अतिशय महत्त्वाची कथा आहे. निखिलेश हे एक मनाचे स्वच्छ व निरागस असे पात्र लेखकाने उभे केले आहे. आपण दर्जेदार पेंटिंग काढावे असे विचार सदैव त्याच्या मनात रुंजी घालत असतात पण त्याच्या काही मर्यादा असल्याने त्याला ते शक्य होत नाही. या



त्याच्या अपयशाचा त्याच्या मनावर प्रचंड परिणाम होतो आणि त्याचा त्याला अतिशय मनस्ताप होतो. त्याचे मन उद्विग्न होते. खरा त्रास त्याला मित्र मैत्रिणी जेव्हा त्याने काढलेल्या चित्रांना नावे ठेवतात तेव्हा होतो. तरी पण तो मानसिकरित्या ह्या सर्व गोष्टी सहन करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असतो.

या मनस्तापाचा त्याच्यावर मानसिक व शारीरिक त्रास होऊन त्याचे डोके दुखायला लागते. डॉक्टरकडून गोळ्या घेऊनही त्रास होतो तेव्हा तो स्पेशालिस्टकडे जातो अन् दाखवतो तर त्याला मेंदूत ट्यूमर असतो. हा ट्यूमर एकदा काढला तर वाढणार नसण्याची यत्किंचितही शक्यता नसते पण तो मोठा असल्याने काढता येत नाही. मेंदूत शस्त्रक्रिया केल्यास दुसऱ्या भागाला इजा होण्याची शक्यता असते. त्याला हा शारीरिक आजार होतो अन् त्यातच त्याच्यात अनपेक्षित बदल होतो. या संकटातून तो उभारी घेतो व त्यातून त्याला जडलेल्या या व्याधीमुळे मात्र वेगळ्याच प्रकारची प्रतिभा लाभते. त्याच्या नेणिवेत असणारी पेंटिंग त्याला सहजच काढता यायला लागतात. त्यालाही या गोष्टींचे आश्चर्य वाटते. जावडेकरांनी या गोष्टींचे चित्रण अनेक बारकाव्यांनी केले आहे. मनावर झालेला परिणाम माणसाचे जीवन कसे बदलू शकतो याचे हे ज्वलंत उदाहरण या कथेत मांडले आहे. माणसाच्या मनावर होणारा विपरीत परिणाम त्याची हानी करू शकतो पण चांगला परिणाम हा त्याचा कसा फायदा करतो याचे प्रत्यंतर येथे येतांना आपणास दिसते.

फ्रॉइडच्या सिद्धांताप्रमाणे माणसांना दिवास्वप्ने बघण्याची सवय असते. त्याच्या हातून नेहमी चुका होतच असतात. कारण शेवटी तो माणूस आहे. पण कधी कधी चमत्कृतीजन्य असे विनोदी घडतात. स्वप्न हा मानसशास्त्रातला अतिशय महत्त्वाचा घटक आहे. इंटरप्रिटेशन ऑफ ड्रीम्स या ग्रंथात भावनिक व मानसिक विकृतीचे दर्शन घडवले आहे. स्वप्नात अतृप्त इच्छांची खरी पूर्ती होते. अचेतन मनाची सतत चेतन मनात प्रवेश करण्याची धडपड चालू असते. अगदी असेच कथानक जावडेकर यांनी गेम या विज्ञानकथेत रेखाटले आहे. रविन हा तरुण अशाच एका प्रकारच्या दिवास्वप्नात पडतो. मनजीत हा त्याचा जवळचा मित्र आहे. त्याच्याकडून त्याला एका गेमची सीडी मिळते. या सीडीत अतिशय अप्रतिम असा गेम आहे.

मनजित ही सीडी देतांना एक पुष्टी जोडतो की, तुला नक्की आवडेल. आणि मग या मनजीतच्या पुष्टीमुळे त्याची मानसिकता चाळवली जाते. त्याचे मन अतिशय उत्सुक होते आणि तो गेम सुरू करतो. पण हा गेम खेळताना तो दारूच्या नशेत असतो. शेजारच्या ब्लॉक मधील स्त्री ही चावी नसल्याने त्याच्या घरी येते. ही स्त्री त्याला आधीपासून आवडत असते. अन तीच चक्क घरी अन् तिला बघितल्यावर असंख्यवेळा त्याच्या वासना चाळवल्या जातात. गेममधले वातावरण व वास्तव याच्यात त्याला दारूच्या नशेमुळे फरक जाणवत नाही. ती स्त्री, अनेक माणसे ते लहान बाळ यांच्याबरोबरच ही वास्तवातली शेजारीण त्याला गेम मधलीच भासू लागते. त्याच्या मनातील वासना जागृत होतात तिच्याविषयी वासना, भूक व विकृती या भावना त्याच्या मनात निर्माण होतात. गेमच्या धर्तीवर तो तिच्याशी अतिप्रसंग करायला लागतो. ती प्रतिकार करत असताना त्याच्याकडून तिचा अनपेक्षितरित्या खून होतो. हा गेमच आहे असे त्याला दारूच्या नशेमुळे वाटत राहते. एकूणच वासना, भूक, विकृती व दुःख यातूनच या घटना त्याच्या हातून अचानक घडतात. जेव्हा आपणाकडून विपरीत घडले याची जाणीव त्याला होते तेव्हा तो पश्चाताप करतो एकूणच नायकाच्या अबोध मनातील भाव, भय, विकृती व दुःख या कथेमध्ये जाणवतात.

माणसाच्या मनामध्ये असणारे भय, भूक, दुःख, वासना, निराशा व तृप्ती याचा विचार मानसशास्त्रात अतिशय महत्त्वाचा आहे. आपल्या मनात काही अनुभव दबले वा दाबले गेलेले असतात ते इतक्या खोलवर जातात की मोठ्या प्रयासानेही ते जाणीवेच्या कक्षेत येत नाही ते नेहमीच असंज्ञ अबोध राहतात. या अबोध असंज्ञ भागात मूळ प्रेरणा, प्रवृत्ती वसत असतात. त्यावर कामप्रेरणेचा प्रभाव असतो. या अबोध भागातील दबलेले अनुभव स्वप्नांमध्ये नशेमध्ये प्रतिभारूपानं प्रकट होत असतात. 'रविन' या पात्राची मनोवस्था सुबोध जावडेकरांनी अशीच रेखाटलेली आहे.

'माणूसपणाचे रसायन' या कथेतून जावडेकरांनी वैद्यकीय संशोधनाने कशी भरारी घेतली आहे, याचे वास्तव चित्रण रेखाटले आहे. माणसाने विज्ञानाच्या आधारे अनेक गुंतागुंतीच्या समस्यांवर मात केली आहे. पशु, पक्षी व प्राणी यांच्यावर असंख्य प्रयोग मानवजातीच्या भल्यासाठी वा आरोग्य उपचारासाठी



कसे केले जातात हे सांगितले आहे. हे त्याचा वापर कोणकोणत्या प्रकारे कसा करून घेतला जातो, हे स्पष्ट केले आहे. सुरुवातीला संशोधनाअंती प्रयोग करताना होणाऱ्या चुकांमुळे प्राण्यांनाच नव्हे तर संवेदनशील मनाच्या माणसांना कसा त्रास सहन करावा लागतो ते स्पष्ट केले आहे.

बालमानसशास्त्रानुसार लहान मुलांची वर्तणूक कशी असते हे त्यांच्या ध्यानात येते व ते चटकन उठून फोनकडे धावतात. त्या रीमा नामक माकडाच्या पिलाला मारू नका अशी विनवणी त्यांना करायची असते; पण समोरून त्यांना समजते की आपला प्रयोग यशस्वी झाला. भरपूर डी. आर. सी. नावाचे उपयुक्त द्रव्य त्या माकडाच्या पिलाकडून मिळाले असे समजते. डॉ. पै यांचे अभिनंदन होते पण त्यांच्या मुखातून एकही शब्द निघत नाही. डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहू लागतात. रिसीव्हर गळून पडतो. एकूणच डॉ. पै. यांच्या मनाचे हळवेपण, संवेदनशीलता, निराशा दिसते. रिमा या माकडाच्या पिलाप्रतीचा जिव्हाळा आणि शेवटी आलेले नैराश्य अशा अनेक घटनांची सरमिसळ या विज्ञान कथेत येते. माणसाचे जीवन वास्तव या कथांमधून रेखाटताना जावडेकरांनी विज्ञानाचा धागा पकडला आहे. विज्ञान जरी आज श्रेष्ठ असले तरी माणसांच्या भावना, प्रेम, जिव्हाळा, संवेदनशीलता याचे मोठेपण अधोरेखित केले आहे.

जीवन जगत असताना मनुष्याच्या समोर असणारे असंख्य प्रश्न त्याला भेडसावत असतो. जगातील असंख्य गोष्टींचे अज्ञान माणसाच्या मनात असते ते हळूहळू उलगडत जाते. 'शेवटचे शतक', 'यंत्राचार', 'आठवणी दाटतात' या तीन कथांमधून अशाच अनेकविध मानवी प्रश्नांची उकल जावडेकर करताना आपल्याला दिसतात. अनेक प्रश्न घेऊन त्यांच्या या कथा आपल्यासमोर येतात. अनेक मानवी पेच निर्माण करणाऱ्या या कथा मानवाच्या मनाची गुंतागुंत स्पष्ट करताना दिसतात.

एकूणच माणसाच्या मनातील अबोध भाव श्रद्धा, उत्कटता, निराशा अशा भावनांचे संमिश्र मिश्रण जावडेकरांनी रेखाटले आहे. एकंदरीत सुबोध जावडेकर यांच्या समग्र कथांमध्ये एक गोष्ट प्रामुख्याने ध्यानात घ्यावी लागते ती म्हणजे विज्ञान हाच त्यांच्या या सर्व कथांचा पाया असून त्यातून मानवी मनाची विविध वलये तार्किकता आणि प्रभावी कल्पनाशक्ती यांच्या माध्यमाने



साधलेली परिणामकारकता निश्चितच दृष्टिगोचर होते.

जावडेकरांच्या या सर्वच कथांमध्ये माणसांच्या कथा आहेत. विज्ञान कमी आणि माणसांचे मानसिक अवस्थेतले प्रश्नच जास्त जाणवतात. या कथा मानवासंबंधीच्या वेगवेगळ्या प्रश्नांना भिडणाऱ्या आणि त्यांचा शोध घेणाऱ्या कथा आहेत. मनुष्य आणि विज्ञान यांचा संघर्षही या कथांमध्ये येतात पण माणसाचा परिस्थितीशी असणारा संघर्ष मात्र अतिशय महत्त्वाचा आहे. म्हणूनच जावडेकरांनी या कथांमधून विज्ञानाबरोबर परात्मभावाचे चित्रण, त्यांच्या मनातील संघर्ष आंतरमनातील प्रक्रिया यांचे वास्तववादी चित्रण या विज्ञानकथा संग्रहातून येते.

**डॉ. प्रकाश शेवाळे**
मराठी विभाग,
लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय,
पंचवटी, नाशिक
भ्रमणध्वनी- ८९७५५५५८१५

□□□

'अक्षर वाङ्मय' ची वर्गणी मनीऑर्डर / धनादेश /धनाकर्ष संपादक 'अक्षर वाङ्मय' या नावे किंवा मेल ट्रान्सफरने वर्गणी जमा करावयाची असल्यास भारतीय स्टेट बँक शाखा, अहमदपूर, जि. लातूर येथे जमा करावी.

**खाते:** संपादक 'अक्षर वाङ्मय' खाते क्र. ३६८३२८४६७५६
IFSC बँक क्र. SBIN - 0020041 या बँकेतील
अक्षर वाङ्मय खाते क्र. ३६८३२८४६७५६

वार्षिक वर्गणी रु. ५००/-
द्विवार्षिक वर्गणी रु. ९००/-
पंचवार्षिक वर्गणी रु. २०००/-
गुगल पे नं.- ९४२३६५५८४१



# 'स्त्री जाणिवा आणि स्त्री संवेदना : एक अभ्यास' : नवा आश्वासक समीक्षा ग्रंथ

- डॉ. अरुण ठोके

'स्त्री जाणिवा आणि स्त्री संवेदना एक अभ्यास' (निवडक कवयित्रींच्या आधारे) या समीक्षात्मक ग्रंथाचे नुकतेच प्रकाशन झालेले आहे. प्रस्तुत ग्रंथात महाराष्ट्रातील वेगवेगळ्या प्रांतांतील समकालीन स्त्री कवयित्रींच्या निवडक पंधरा कवितांचा आशय व अभिव्यक्ती या दोन अंगांनी स्त्री जाणीवा व स्त्री संवेदनासंदर्भात विचार करण्यात आलेला आहे. स्त्री जाणीवा समृद्ध करणाऱ्या आशयसूत्राचा शोध घेणे यासाठी समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय व आदिबंधात्मक समीक्षा पद्धतींचा अवलंब करण्याचा प्रयत्न रचना यांनी केलेला आहे.

आपल्या समाजात स्त्रीला दुय्यम मानण्याच्या धारणेमुळे रूढ झालेल्या परंपरांनी स्त्रियांच्या अभिव्यक्तीला फारसा वाव नव्हता. किंबहुना संत कवितेच्या परंपरेतही पुरुषांच्या तुलनेने स्त्री कवयित्रींची संख्या फार कमी होती. ज्या संत कवयित्रींनी कविता लिहिल्या त्यांना फार सोसावे लागले. संत कवयित्री जनाबाई, कान्होपात्रा व संत बहिणाबाई यांची उदाहरणे सांगता येतील. तरीही तत्कालीन समाजाला पुरोगामी दृष्टिकोन बहाल करण्याचे काम या कवयित्रींनी केले.

आधुनिक काळात मराठी कवितेत क्रांती झाली. केशवसुत ते मर्ढेकरी कविता, मर्ढेकरी कविता ते साठोत्तरी कविता ही मराठी कवितेची वेधक वळणे आहेत. या वळणांवरही बोटावर मोजण्याइतक्याच स्त्री कवयित्रींची कविता पुढे आली. स्त्रीवादी चळवळीच्या प्रभावातून स्त्रिया स्त्री जाणिवेच्या स्वतंत्र कविता लिहू लागल्या. ऐंशीच्या दशकात कवयित्रींच्या संख्येत बरीच वाढ झाली. नव्वदोत्तर काळात स्त्री जाणिवांचे प्रकटीकरण करणाऱ्या कवयित्रींची संख्या लक्षणीय आहे. आपल्याच काळात लिहिणाऱ्या नवोदित कवयित्रींच्या कवितांची दखल घेऊनन त्यावर साधक बाधक चिंतन करण्यातून प्रस्तुत ग्रंथांची निर्मिती झालेली आहे.